**नियमित दिवाणी दावा क्र.३३२/२०१२ मधील नि.क्र. ६३ वरील आदेश**

( पारीत दिनांक – १७/०९/२०२५)

रघुनाथ म्हादु कोकणे-जाधव वि. निवृत्ती बाबु कोकणे-जाधव

**CNR MHKO130011362012**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी साक्षीदार तपासणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा कामी वादीतर्फे काही कागदपत्रे, ऊसबील पावत्या वगैरे हजर केल्या असून, सदर कामी वर नमुद कागदपत्रे शाबीत करुन पुराव्याचे कामी वाचणे आवश्यक आहे. वादीतर्फे कागदपत्रांच्या अनुषंगाने पुरावा करणे अनावधानाने राहुन गेले आहे. सबब, वादीतर्फे साक्षीदारांचा पुरावा करणेस व साक्षीदार तपासणेस परवानगी मिळावी मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना पुढे चालविण्यात येतो.

**०४.** वादींच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे वारंवार पुरेशी संधी देवूनही युक्तीवाद कामी कोणीही हजर न झाल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीच्या युक्तीवादाविना चालविण्यात येतो.

**०५.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे साक्षीदार तपासणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादींनी अर्जात केलेली कथने ही शपथेवरती केलेली आहेत. त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, वादीस पुरावा देण्याची संधी देणे योग्य राहील तसे न झाल्यास याकामी त्रुटी राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. किंबहुना, तसे न झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे उल्लंघन होईल. प्रस्तुतचे प्रकरण १० वर्षांहूनही जुने आहे. वादींच्या सदर कृत्यामुळे याकामी जो विलंब झालेला आहे त्याकरीता काही रक्कम वादींवर खर्च म्हणून बसविणे योग्य राहील. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो:–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.६३) वादी यांनी तालुका विधी सेवा

समिती, कागल यांना रक्कम रुपये ६००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर  करण्यात येतो.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2025.09.18 11:02:04 +0900

कागल. (प्रणिता एस.पाटील)

दिनांक – १७/०९/२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कागल.